आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल अॅप !
अॅप डाऊनलोड करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा !

शिल्पकार विकासाचा...
# देशदूत

राज-का-रण
कोण आहेत हो हे सुधाकर बडगुजर..?
बडगुजर काही दिवसातच गिरीश महाजन यांच्या गळ्यातील ताईत बनलेले दिसतील आणि पुढील चार वर्षात भाजपचे विधानसभेचे उमेदवार झाल्यास आश्चर्य वाटणार नाही. काळाचा महिमा किती अगाध असतो याचा प्रत्यय लोकांनाही येईल आणि बडगुजर यांना एवढे महत्व का मिळत होते याचे उत्तर त्यांना कदाचित मिळाले असेल.
वाचा शब्दगंधमध्ये

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ | अंक २७१ | रविवार, दि. ८ जून २०२५ | पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## थोडक्यात

### तीन मोठ्या बँकांनी व्याज दर घटवले

**नवी दिल्ली ।** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने काल पतधोरण जाहीर करत रेपो रेटमध्ये ५० बेसिस पॉईंटची कपात केली. यामुळे रेपो रेट ५.५० टक्क्यांवर आला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निर्णय घेतल्यानंतर आता बँकांकडून व्याज दरात कपात करण्यात आली आहे.पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ इंडिया यासह विविध बँकांकडून व्याज दरात कपात करण्यात आली आहे. यामुळे कर्ज घेणाऱ्यांना मोठा दिलासा मिळेल तर ज्यांची कर्ज अगोदरपासून सुरु आहेत त्यांचा इएमआय कमी होईल.

### अकरावीसाठी १२ लाखांवर विद्यार्थी

**पुणे ।** यंदा प्रथमच राज्यभर ऑनलाइन आणि केंद्रीय पद्धतीने राबवण्यात आलेल्या अकरावी प्रवेशप्रक्रियेला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. अंतिम मुदतीपर्यंत तब्बल १२ लाख ७१ हजार २९५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे प्रभारी संचालक डॉ. श्रीराम पानझाडे यांनी दिली आहे. वेळापत्रकानुसार, शून्य फेरीची गुणवत्ता यादी दि. ८ जून २०२५ रोजी जाहीर होणार आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपणार आहे.

### मदर डेअरी प्रकरणी काँग्रेसचे आज आंदोलन

**मुंबई ।** धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या नावाखाली भाजप महायुती सरकार मुंबईतील विविध ठिकाणच्या मोक्याच्या जागा अदानीला भेट देत सुटले आहे. मिठागरे, देवानर डंपिंग ग्राऊंडची जमीन दिल्यानंतर आता कुर्ल्यातील मदर डेअरीची साडेआठ हेक्टर जमीनही देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या निर्णयाच्या विरोधात मुंबई काँग्रेसच्या वतीने आज, रविवारी जनआक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे.

### सोनिया गांधी यांची प्रकृती स्थिर

**नवी दिल्ली।** काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांची शनिवारी प्रकृती बिघडली. रक्तदाब वाढल्याने त्यांना तातडीने सिमला येथील इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज रुग्णालयात दाखल करण्यात आले. याठिकाणी डॉक्टरांच्या देखरेखीत त्यांच्यावर उपचार करण्यात आले. सोनिया गांधी रुटीन चेकअपसाठी हॉस्पिटलला आल्याचे ज्येष्ठ वैद्यकीय अधीक्षक डॉ. राहुल राव यांनी सांगितले. मुख्यमंत्री सुखविंदर सिंग यांच्या माध्यम सल्लागारांनी सांगितले की, सोनिया गांधी प्रकृतीच्या कारणास्तव रूटीन तपासासासाठी हॉस्पिटलला आल्या होत्या. त्यांची प्रकृती स्थिर आहे अशी माहिती त्यांनी दिली.

# मनसेची चाचपणी

## ठाकरेंच्या शिवसेनेसोबत की एकला चलो रे...?

**मुंबई । वृत्तसंस्था**



मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनाची चर्चा सुरु असतानाच राज ठाकरे यांच्या निवासस्थानी बैठकांचा सिलसिला सुरू आहे. आज मनसेच्या केंद्रीय समितीची पुन्हा बैठक शिवतीर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी पार पडली. या बैठकीत अनुभवातून धडा घेत ठाकरेंच्या शिवसेनेसोबत की 'एकला चलो रे' या प्लॅन ए आणि प्लॅन बी वर चर्चा करण्यात आली.

शिवसेना ठाकरे गटाच्या मुंबई महापालिका शिवसेनेकडे ठेवण्यासंदर्भात हालचाली सुरू आहे. दुसरीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही आपल्या विभाग अध्यक्ष, उपविभाग अध्यक्ष, गटनेते शाखाप्रमुख इत्यादीसोबत झालेल्या बैठकीचा अहवाल राज ठाकरे यांच्याकडे केंद्रीय समितीने सादर केला. ३६ विधानसभा मतदारसंघातील आढावा घेतल्यानंतर पक्षातील रिक्त पद, पक्षाची स्थिती, पक्षाकडे सध्या असलेली ताकद, पक्षाबाबत लोकांचा असलेला कल, आणि अपेक्षित बदल या सर्व गोष्टीचा लेखाजोखा राज ठाकरेंकडे अहवालाद्वारे मनसेच्या केंद्रीय समितीच्या नेत्यांनी सादर केला आहे. आगामी १३ जून २०२५ रोजी गटाध्यक्षांच्या केंद्रीय समितीची बैठक होईल. सोबतच मतदार संघाबाबतही नवे अहवाल सादर होतील, अशी माहिती समोर आली आहे.

२०१४ आणि २०१७ या निवडणुकानंतर पुन्हा एकदा २०२५ च्या मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे ब्रँड टिकवायला मनसेप्रमुख उद्धव ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येतील ही चर्चा रंगली आहे. सलग तीन दिवसाच्या चर्चेनंतर मुंबईत राज आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याचे मराठी माणसाचे गळ घालणारे पोस्टर्स पहायला मिळत आहे.

### तिघे एकत्र आले, तर पुन्हा वैभव मिळेल : कीर्तीकर

उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या जवळच्या माणसांपासून सावध राहिले पाहिजे आणि त्यांनी राज ठाकरेंना जवळ ठेवले पाहिजे, असा सल्ला देत शिवसेनेचे ज्येष्ठ नेते गजानन कीर्तिकर यांनी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले, तर बाळासाहेबांना ती खरी श्रद्धांजली ठरेल, असे विधान केले. उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे एकत्र आले, तर शिवसेना भक्कम होईल. शत प्रतिशत स्वबळावर राज्य करण्याची इच्छा ज्यांना कुणाला झालेली आहे, त्यांची ती इच्छा पूर्ण होणार नाही, जर हे तिघे एकत्र आले तर पुन्हा ते वैभव मिळेल. एकत्र येऊन तर बघावे, असे कीर्तिकर म्हणाले.

### मातोश्रीवर निघालोय...

माध्यमांमध्ये सुरू असलेल्या याच चर्चा, खलबते आणि उत्सुकतेवर राज ठाकरे यांनी आज त्यांच्या हजरजबाबी वृत्तीने उत्तर देत फिरकी घेतली. 'शिवतीथ'वर आज सकाळपासून सुरू असलेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर राज ठाकरे कारमधून बाहेर निघाले. पुढे कार थांबवून काच खाली केल्यानंतर माध्यमांच्या प्रतिनिधींपैकी एक प्रतिनिधी तातडीने धावत कारपाशी आला आणि राज ठाकरेंना, कुठे दौरा? असे विचारले असता राज ठाकरे यांनी चटकन...मातोश्रीवर निघालोय... असे म्हणत फिरकी घेतली आणि घरगुती कामानिमित्त बहिणीकडे चाललोय, असे पुढे लगेच स्पष्टही केले.

### पवारांचे गणित

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या सभांना मोठी गर्दी होत असली, तरी त्यांच्या पक्षाला मते मिळत नाही. तर दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या सभांमध्ये होणारी गर्दी मतांमध्ये रुपांतरीत होते, असे गणित राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी येथे मांडले.

# निवडणूक आक्षेपांवरून राजकारण तापले

## राहुल गांधी, आयोगाचे आरोप-प्रत्यारोप

- काँग्रेस नेत्यांची पाठराखण
- सत्ताधाऱ्यांचे टीकास्त्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**



महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लेखात केलेल्या आरोपांवरून राजकारण तापले आहे. सत्ताधाऱ्यांनी राहुल गांधींवर टीकास्त्र सोडले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानेही उत्तर देत राहुल गांधी यांचे आरोप हास्यास्पद असल्याचे स्पष्टीकरण दिले होते. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगालाही प्रत्युत्तर दिले आहे.

राहुल गांधी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, निवडणूक आयोग ही एक घटनात्मक संस्था आहे. त्यामुळे तुम्ही स्वाक्षरी नसलेल्या आणि माहिती देण्याची टाळाटाळ करणाऱ्या पत्रकांचे माध्यमांमार्फत वितरण करणे, हा गंभीर प्रश्नांना उत्तर देण्याचा योग्य मार्ग नाही. आपल्याला काहीही लपवायचे नसेल, तर माझ्या लेखातील प्रश्नांची थेट उत्तरे द्या. यासोबतच, लोकसभा आणि सर्व राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुकांसाठी एकत्रित, डिजिटल आणि मशीन-रिडेबल मतदार यादी प्रकाशित करा. तसेच, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतदान केंद्रांवरील संध्याकाळी ५ नंतरचे सर्व सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक करा.



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबत लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी आकडेवारीसह मांडलेले सत्य हा फक्त निव्वळ लेख नाही तर भारताच्या लोकशाहीवरील योजनाबद्ध केलेल्या आघाताचे सत्य उघड करणारा दस्ताऐवज आहे.

**■ रमेश चेन्नीथला,** प्रभारी, काँग्रेस महाराष्ट्र



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतदान चोरीचा पॅटर्न आगामी बिहार विधानसभा निवडणूक, मुंबई महानगरपालिका निवडणूक तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतही वापरण्याचे षड्यंत्र आहे.

**■ हर्षवर्धन सपकाळ,** प्रदेशाध्यक्ष, काँग्रेस



राहुल गांधी यांचा नवा लेख म्हणजे एकामागून एक निवडणूक हरल्याचे त्यांचे दु:ख आणि निराशेमुळे, बनावट नरेटिव्ह सेट करण्याची ब्लूप्रिंट आहे.

**■ जे. पी. नड्डा,** अध्यक्ष, भाजप



राहुल गांधी सत्य स्वीकारणार नाहीत,तोपर्यंत त्यांच्या पक्षाला कुठलेही भवितव्य उरलेले नाही. मला वाटते, स्वतःशीच खोटे बोलून, स्वत:ला दिलासा देण्याचे काम राहुल गांधी करत आहेत.

**■ देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

# बिहारमध्ये एनडीएचा फॉर्म्युला ठरला?

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार २४३ विधानसभा जागांपैकी जेडीयू आणि भाजप जवळजवळ समान जागांवर निवडणूक लढवतील. यात जेडीयूला १०२ ते १०३ आणि भाजपला १०१ ते १०२ जागा देण्याचे ठरले आहे.

एनडीएचे इतर मित्रपक्ष, चिराग पासवान यांच्या एलजेपी (रामविलास), जीतन राम मांझी यांच्या हिंदुस्थानी अवम मोर्चा (एचएएम) आणि उपेंद्र कुशवाह यांच्या राष्ट्रीय लोक मोर्चाला किती जागा द्यायच्या यासंदर्भातही फॉर्म्युला निश्चित झाला आहे. महत्वाचे म्हणजे, यासंदर्भात अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही. मात्र, माध्यमांनी सूत्रांच्या हवाल्याने एनडीएमध्ये जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाल्याचे म्हटले आहे. यात नितीश कुमार यांच्या जेडीयू आणि भाजपला समान जागा मिळणे अपेक्षित आहे. चिराग यांच्या एलजेपी (आर) चे बिहारमध्ये ५ खासदार आहेत, त्यांना २५-२८ जागा मिळू शकतात, तर ४० जागांचा दावा करणाऱ्या जीतन मांझी यांच्या एचएएमला ६-७ जागा मिळू शकतात. २०२० च्या निवडणुकीतही पक्षाने ७ जागांवर निवडणूक लढवली आणि ४ जागा जिंकल्या होत्या.

तसेच, उपेंद्र कुशवाह यांच्या आरएलएमला ४-५ जागा देण्याचे ठरले आहे. या जागावाटपांतर्गत, एनडीएमधील घटक पक्षांना साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या फॉर्म्युल्यानुसार, जागावाटप निश्चित मानले जाते परंतु त्याची अंतिम घोषणा अद्याप झालेली नाही. जर आपण २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीबद्दल बोललो तर, त्यावेळी एनडीएमध्ये जेडीयू, भाजप, एचएएम आणि मुकेश साहनी यांचे व्हीआयपी यांचा समावेश होता. त्यानंतर भाजपने ११०, जेडीयू ११५, एचएएम ७ आणि साहनी यांच्या पक्षाने ११ जागांवर निवडणूक लढवली. ज्यामध्ये भाजपने सर्वाधिक ७४ जागा जिंकल्या होत्या.



◉ शहरातील ईदगाह मैदानावर बकरी ईदनिमित्त एकमेकांना शुभेच्छा देतांना मुस्लीम बांधव (बातमी पान ३ वर)

# थायलंड-कंबोडियात तणाव

**बँकॉक । वृत्तसंस्था**

### सीमेवर वाढवले सशस्त्र सैन्य

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षानंतर आता आशियात आणखी २ देशांत युद्धाची परिस्थिती तयार झाली आहे. या दोन्ही देशांनी आपापल्या सीमेवर मोठ्या संख्येने सैन्य तैनात केले आहे. थायलंड आणि कंबोडिया या दोन्ही देशात तणावाची स्थिती आहे.

कंबोडियासोबत सीमावादाच्या पार्श्वभूमीवर थायलंडने सैनिकांची संख्या वाढवली आहे. त्यामुळे पूर्व आशियात होणाऱ्या शांततेच्या प्रयत्नांना फटका बसण्याची शक्यता आहे. या दोन्ही देशांचेही चीनसोबत द्विपक्षीय संबंध आहेत. सध्या दक्षिण पूर्व आशियात मलेशियाचे पंतप्रधान अनवर इब्राहिम शांततेचा प्रयत्न करत आहेत परंतु त्यात यश मिळाले नाही.

२८ मे रोजी अनिश्चित सीमा रेषेवर झालेल्या झटापटीत एक कंबोडियन सैनिक मारला गेला तेव्हापासून दोन्ही देशांमध्ये तणाव वाढला आहे. अनेक दिवसांपासून दोन्ही देशांसोबत दक्षिण पूर्व आशियातील सरकार शांततेचा प्रयत्न करत आहेत. परंतु थायलंडचे उपपंतप्रधान फुमथम वेचायाचाईने यांनी म्हटले की, कंबोडियाने गुरुवारी द्विपक्षीय चर्चेबाबत आमचा प्रस्ताव फेटाळून लावला. या प्रस्तावामुळे तणाव कमी होऊ शकला असता असे त्यांनी सांगितले.

### गोदावरी नदीपात्रात सहा मुले बुडाली

**गडचिरोली ।** जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या तेलंगणाच्या हद्दीतील मेडीगड्डा धरणाजवळ गोदावरी नदीपात्रात आंघोळीसाठी उतरलेली सहा मुले बुडाली. काल सायंकाळी ५ वाजता ही घटना घडली. सहाही मुले तेलंगणाची असून त्यांचा अद्याप शोध लागलेला नाही. महाराष्ट्र व तेलंगणा या दोन राज्यांच्या सीमेवरील मेडिगड्डा धरणाजवळून गोदावरी नदी वाहते. नदीच्या पात्रात आंघोळीसाठी सहा मुले गेली होती.

# मनमाड-इंदूर रेल्वे मार्गासाठी भूसंपादन सुरू

**नाशिक । प्रतिनिधी**

मनमाड-इंदूर या नव्या प्रस्तावित रेल्वे मार्गासाठी भूसंपादन प्रक्रिया नाशिक जिल्ह्यात सुरू करण्यात आली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून प्रस्ताव रेल्वे विभागाकडे सादर करण्यात आला असून, या भूसंपादनाच्या कामाची जबाबदारी उपजिल्हाधिकारी रवींद्र भारदे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

### येथे होणार भूसंपादन

चौंडी, जळगाव (नि.), चिखलओहोळ, काळेवाडी, घोडेगाव, घोडेगाव चौकी, वऱ्हाणे बु., मेव्हणे, ज्वार्डी बु.,ज्वार्डी खु., सवंदगाव, सायने, मल्हार गाव, झोडगे (सर्व मालेगाव तालुका). मनमाड, अस्तगाव, पांझनदेव, खादगाव, नवसारी, भार्डी (सर्व नांदगाव तालुका).

मनमाड-इंदूर रेल्वे मार्गाच्या उभारणीसाठी सुरू करण्यात आलेली ही भूसंपादन प्रक्रिया हा प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव व नांदगाव तालुक्यांतील एकूण २१ गावांमध्ये भूसंपादन प्रक्रिया राबवली जाणार आहे. स्थानिक प्रशासनाने या गावांची यादी निश्चित करून त्याची माहिती रेल्वेसह संबंधित विभागांना कळविण्यात आली असून, त्यांच्या परवानगीनंतर भूसंपादन प्रक्रिया राबवली जाणार आहे.

या भूसंपादन प्रक्रियेबाबत स्थानिक शेतकरी व रहिवाशांनी सहकार्य करावे, योग्य ती कागदपत्रे सादर करावीत व प्रशासनासोबत संवादात राहावे, असे आवाहनही शेतकऱ्यांना प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे.

# ...अन् विखुरलेली भिंत झाली बोलकी

## 'सीपी व्हॉट्सॲप'वर ज्येष्ठ महिलेची तक्रार; पोलिसांच्या तत्परतेने भरपाई

**नाशिक । प्रतिनिधी**

मद्यपि कारचालकांकडून संरक्षक भिंतीचे नुकसान आणि कारमधील तरूणांकडून दमदाटी याबाबत एक ज्येष्ठ महिलेने शहर पोलीस आयुक्तांच्या 'सीपी व्हॉट्सॲप' नंबरवर मेसेज करुन कैफियत मांडली. मेसेज मिळताच पोलिसांनी तपास चक्रे फिरवत संशयितांचा शोधून महिलेला भरपाई मिळवून दिली.

पासष्ठ वर्षीय महिला उपनगर पोलिसांच्या हद्दीतील नारायण बापू चौकात वास्तव्यास आहे. तिची मुलगी सायकोलॉजिस्ट असून मे महिन्यातील एका रात्री महिला घरात झोपलेली असताना भरधाव कारने जाणाऱ्या दोघा मद्यपींनी तिच्या घराच्या पान १० वर >>>



◉ अपघातानंतर तुटलेली भिंत



◉ भरपाई मिळाल्यानंतर बांधलेली भिंत

### दृष्टीक्षेपातून

- व्हॉटसॲप हेल्पलाइन नंबर : ९९२३३२३३११
- नाशिकमध्ये 'रोमिओगिरी' खपविणार नाही; आयुक्तालयाचा इशारा
- महिला सुरक्षेला प्राधान्य, तक्रारीनुसार कारवाई क्रमप्राप्त
- तुम्ही अजूनही गप्प आहात?, 'बोला, आम्ही कारवाईसाठी सज्ज आहोत' या स्वरुपात पोलिसांचे तक्रारींसाठी आवाहन

# बाबा सिद्दिकी हत्याप्रकरणी आरोपीला कॅनडात अटक

**मुंबई । वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी झिशान अख्तर उर्फ जस्सी पुरेवाल याला कॅनडातील सरे पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. बनावट पासपोर्टच्या आधारे झिशान कॅनडात पोहोचला होता अशी सूत्रांची माहिती आहे.

मुंबई पोलीस झिशान अख्तरला ताब्यात घेण्याची माहिती वरिष्ठ पातळीवर घेत आहेत.बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात फरार असलेल्या महत्वाच्या आरोपींपैकी एक आरोपी म्हणून पोलीस झिशान अख्तरचा शोध घेत होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या १२ ऑक्टोबर २०२४ ला करण्यात आली होती. झिशान सिद्दिकी याच्या कार्यालयाबाहेर रात्रीच्या वेळी बाबा सिद्दिकी यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता. लॉरेन्स बिश्नोई टोळीकडून बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची जबाबदारी स्वीकारली होती.